दि.२१/०८/२०१९

<u>प्रेसनोट</u>

<u>दत्तवाडी पोलीस स्टेशन, पुणे शहर.</u>

## **<u>दत्तवाडी पोलीसांनी उभारले मनशांती करीता वाचनालय</u>**

पुस्तक हेच आपले ज्ञानाचे गुरु या उक्तीप्रमाणे दत्तवाडी पोलीस स्टेशन चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक देविदास घेवारे यांनी पोलीस स्टेशनमध्येच वाचनालय उभारले आहे.प्रत्येक व्यक्तीचा काहीना काही निमीत्ताने पोलीस विभागाशी संपर्क येत असतो. पोलीस स्टेशनमध्ये येणारा व्यक्ती हा मानसिकदृष्टया दुखावलेला किंवा चिडलेल्या अवस्थेमध्ये असतो. पोलीस स्टेशन मध्ये आल्यावर काही काळ त्याचा वावर त्या परिसरामध्ये राहतो. ठराविक पद्धतीचे शासकीय कार्यालय असल्यास तेथे जाणाऱ्या व्यक्तीस उत्साहवर्धक वातावरण जाणवत नाही या सर्व गोष्टींचा अभ्यास करुन मा.पोलीस आयुक्त डॉ.वेंकटेशम यांनी सुरु केलेल्या कम्युनिटी पोलीसींग अंतर्गत प्रत्येक नागरिकाला पोलीस विभागा कडुन सकारात्मक सुविधा मिळाव्यात याच संदर्भाला अनुसरुन दत्तवाडी पोलीस स्टेशन येथे वरिष्ठ पोलीस निरीक्षक देविदास घेवारे यांनी वाचनालय सुरु केले असुन त्यामध्ये रोजचे येणारे वर्तमानपत्र तसेच महाराष्ट्र पोलीस दलाकडुन प्रकाशित होणारे दक्षता मासिक पुणे शहर पोलीस आयुक्तालयाकडुन प्रकाशित होणारे दर्पण मासिक ज्यामध्ये पोलीस विभागाने नागरिकांकरीता केलेल्या विविध योजना, कामे यांचे वृत्तापत्रामध्ये आलेल्या बातम्यांचे कात्रण संकलीत करुन त्याचे मासिक तयार करण्यात येते हे मासिक नागरिकांना वाचन्याकरीता ठेवण्यात आलेले आहे.

या संदर्भात वरिष्ठ पोलीस निरीक्षक देविदास घेवारे यांनी सांगितले की येणाऱ्या नागरिकांना सकारात्मक सेवा देणे हे पोलीस विभागाचे उद्दिष्ट असुन प्रत्येक व्यक्ती हा पोलीस स्टेशनमध्ये आल्यावर नकारात्मक मानसिकतेमध्ये असतो त्याला काही काळ पोलीस स्टेशनच्या वातावरणाचा अनुभव घेतल्यावर त्याच्यामध्ये नक्की फरक पडतो. वृत्तपत्र व दर्पण मासिक याच्यामध्ये आलेल्या बातम्या किंवा दक्षता मासिकमधील गुन्हयांच्या झालेल्या उकल यांच्या कथा वाचल्यावर त्याच्यामध्ये नक्की फरक पडतो. वाचनामुळे मनुष्याच्या विचार करण्याच्या पद्धतीमध्ये सुधारणा होते. पोलीस कर्मचाऱ्यांकरीता विविध प्रथितयश लेखकांचे पुस्तके वाचण्याकरीता ठेवलेली आहेत त्याचा सर्व कर्मचारी लाभ घेत आहेत.

**(देविदास घेवारे)**

वरिष्ठ पोलीस निरीक्षक

दत्तवाडी पो. स्टे. पुणे शहर



